# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोयायटी,अहिल्यानगर
# राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५ वा वित्त आयोग व राष्ट्रीय आयुष अभियानातील कंत्राटी पदभरती जाहिरात क्र.२/२०२५

राष्ट्रीय आरोग्य अभियान, १५वा वित्त आयोग, राष्ट्रीय आयुष अभियानातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक स्तरावरील विविध कार्यक्रमातील खालील तक्त्यामधील नमुद कंत्राटी पदांची पदभरती करावयाची आहे. त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवारांनी परिपुर्ण भरलेल्या विहित अर्जासहित शैक्षणिक अहर्तेच्या छायांकित प्रती व डीडी सोबत आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) पोस्टाने किंवा समक्ष दि.१६/०६/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ रोजीच्या आत सादर करावेत. विहित मुदती नंतरचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

| Sr. No | Name of Post | Place of Work | Education Qulification | Experiance | No of Post | Category | Remunation in Per Month |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (MBBS) | SDH,RH, DH | MBBS | -- | 31 | SC -5<br>ST -3<br>NT B -1<br>NT C -1<br>NT D-1<br>SBC -1<br>OBC -6<br>Open -13 | 60,000/- |
| 2 | DPM (NHM) | Z.P. office | Any Medical Graduate With MPH/MHA/MBA in Health | -- | 01 | VJA-1 | 35000/- |
| 3 | District QA Coordinator | Z.P. office | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | -- | 01 | Open- 01 | 35000/- |
| 4 | Staff Nurse (IPHS, NCD Screening, Tribl/Non Tribal , L2 , NRC , SNCU , NBSU) | DH,SDH, RH,PHC | GNM/ B.Sc Nursing | -- | 43 | VJ-3 (Femal)<br>NT-1(Femal)<br>SBC- 2(Femal)<br>OBC-3(Femal)<br>Open-23(Femal)<br><br>SC- 2 (Male)<br>NT B-1(Male)<br>NTC -1(Male)<br>NTD -1(Male)<br>OBC -1(Male)<br>Open -5(Male) | 20,000/- |
| 5 | Nutritionist/Feeding demonstrator | RH-Sangamner<br>RH-Neweasa | B.Sc Home Science Nutrition | 1Years Exp. | 02 | SC-1<br>VJ-1 | 20000/- |

| Sr No | Name of Post | Place of Work | Education Qulification | Experiance | No of Post | Category | Remunation in Per Month |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | RBSK-Programe co ordinator | DH | MSW or MA in Social Science | 2 yrs. | 1 | ST-1 | 20000/- |
| 7 | Accountant | Shrigonda Block & DHO office | B.Com With Tally Certification | -- | 03 | ST- 1<br>VJ- 1<br>Open- 1 | 18,000/- |
| 8 | Facility Manager | SDH-Pathardi | B.E. Electronics & Tele Communication /IT/Computer Science OR B.SC IT/ Computer Science OR Diploma Electronics & Tele Communication/IT/Computer Science | 1Years Exp. | 01 | SC-1 | 17000/- |
| **Total post** | | | | | **83** | | |

## १५ वा वित्त आयोग –

| Sr. No | Name of Post | Place of Work | Education Qulification | No of Post | Category | Remunation in Per Month |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer (15th Finance) | UHWC | MBBS/BAMS (MBBS उमेदवार उपलब्ध न झाल्यास BAMS उमेदवाचा विचार करण्यात येईल | 12 | **SC-4**<br>**ST-1**<br>**VJ-1**<br>**NTB-1**<br>**SBC-1**<br>**Open- 4** | MBBS-60,000/- (BAMS- 25,000/-+Max Incentive 15,000/-) |
| 2 | MPW | UHWC | १२ वी विज्ञान शाखा उत्तीर्ण + आरोग्य व कु.क.प्रशिक्षण केंद्र /सार्वजनीक आरोग्य संस्था,नागपुर यांचेकडुन आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकीय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम/आरोग्य व कु.क. मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्स्पेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 23 | **SC-3**<br>**ST-2**<br>**NTB-1**<br>**SBC-1**<br>**OBC-5**<br>**Open-11** | 18000/- |
| 3 | Staff Nurse Female | UHWC | GNM/ B.Sc Nursing | 18 | **SC-2**<br>**NTC-1**<br>**OBC- 2**<br>**Open- 13** | 20000/- |
| **Total post** | | | | **53** | | |

## राष्ट्रीय आयुष अभियान –

| Sr. No | Name of Post | Place of Work | Education Qulification | No of Post | Category | Remunation in Per Month |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | District Programe Manager | AYUSH Hospital | Graduation Degree in Any discipline including AYUSH & MBA in Healthcare Management/ Masters in Health/ Hospital Administration/ Post Graduation diploma in Hospital & Healthcare Management (Two Years) from AICTE recognized institute with minimum 3 years working experience in Public Health Programme. Exposure in Social Sector Schemes/Missions at National, State & District Level & Computer Knowledge including MS Office, MS Word, MS Powerpoint & MS Excel would be desirable. Preference will be given to persons having experience of working in Health Sector including AYUSH. | 01 | **Open - 1** | **35000/-** |
| | | | **Total Post** | **01** | | |

**A.** सदर जाहिरात http://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या कार्यपद्धती बाबत सर्वसाधारण सुचना/माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे. उमेदवारांनी सर्व सुचनांचे वाचन काळजी पूर्वक करुन अर्ज विहित केलेल्या पद्धती नुसार सादर करावेत.अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या व प्रमाणपत्र/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र/ अपात्र ठरविण्यात येईल. व त्याच धर्तीवर उमेदवारांचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

**B.** वैद्यकिय अधिकारी या पदासाठी **MBBS** उमेदवार उपलब्ध न झाल्यास **MBBS** पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ६ ते११ महिन्यांकरिता **BAMS** पदवीधर उमेदवारांस वैद्यकिय अधिकारी म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

**C.** अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असे होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवारांच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करत नसल्यास किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी/निवड तात्काळ रदद् करण्यात येईल.

**D.** वरील पदांमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान, "हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना", शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र, व राष्ट्रीय आयुष अभियान या कार्यक्रमातील अधिकारी व कर्मचारी यांना राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्ती लागु रहातील.

**E.** अर्ज करावयाच्या सुचना :-

1) उमेदवारांनी जाहिरातीतील नमूद अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.
2) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्यांची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
3) अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या सर्व छायांकित प्रती तसेच ज्या प्रवर्गात अर्ज सादर केला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, अनुभव असल्यास अनुभवाचे प्रमाणपत्र व धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कागदपत्र जोडु नयेत.

**E.**वयोमर्यादा :-

1) सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि.२५ एप्रिल,२०१६ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय खुल्या प्रवर्गासाठी १८ वर्ष व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष तसेच मागासवर्गीय प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील.

2)राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये कार्यरत असल्यास ५ वर्ष वयाची अट शिथिल राहील.

**F.**अटी व शर्ती :-

1) सदर सेवा ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून या वर्षातील दि.२९ जून, पर्यत घेतली जाईल, पुढील पुनर्नियुक्ती( ११ महिने २९ दिवसांच्या) कालावधी करिता आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल. तसेच केंद्र शासनाने/राज्य शासनाने सदर पदे नामंजूर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.
2) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा, तसेच अर्जदार विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
3) वरील तक्त्यातील कंत्राटी सेवेकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार आवश्यकते प्रमाणे एका जागेसाठी तीन/पाच या पद्धतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी व इतर माहिती http://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांशी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.
4) अर्जदारास एका पेक्षा अधिक पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज त्या पदासाठीच्या शुल्कासह सादर करावा. अर्जासोबत जोडण्यात आलेल्या डिमांड ड्राप्ट(Demand Draft)धनाकर्षाची रक्कम परत केली जाणार नाही, या अटीवर उमेदवाराने अर्ज करावा.

**G.**अर्जदाराने जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात :

1) अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे नांव, कंत्राटी पदाचे नांव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, Email Id,जन्म दिनांक, शैक्षणिक अर्हतेचे सर्व तपशील - अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, बोर्ड / विद्यापीठाचे नांव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांची टक्केवारी, कामाचा अनुभव - काम केलेल्या शासकीय संस्था/निमशासकीय संस्था/रुग्णालयाचे नांव ज्या पदावर काम केलेले आहे त्या पदाचे नांव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.
2) अर्जासोबत स्वसांक्षाकित असलेले एस.एस.सी. एच.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र, शाळा सोडण्याचा दाखला, पदवी गुणपत्रिका व प्रमाणपत्र, पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका व प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, आधार कार्ड/मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आकाराचे १ फोटो, जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.
3) वैद्यकिय अधिकारी व इतर तांत्रिक कंत्राटी सेवेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबधित कौन्सिलकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र व अद्यावत पुर्ननोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा सदर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

4) याप्रमाणे अर्जासोबत सर्व स्वसाक्षांकित प्रमाणपत्रे जोडून जाहिरातीमधील तक्त्यामध्ये नमुद असलेल्या सेवेच्या नावा समोरील राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, जि.प. अहिल्यानगर या ठिकाणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे नावाने अर्ज सादर करावा.

5) सदर सेवा कंत्राटी पध्दतीने घ्यावयाची असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता लागु राहणार नाही.आवश्यकते प्रमाणे लेखी परीक्षा/मुलाखती करीता येणाऱ्या उमेदवारास दैनिक व प्रवास भत्ता व इतर कोणताही भत्ता मिळणार नाही.

6) मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई क्र. राआसो/मनुष्यबळ/आरक्षण २४५४६-७७४/२०१६ दि.२०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणा-या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

7) ज्या उमेदवारांनी या अगोदर कोणत्याही पदाकरिता अर्ज सादर केलेले असतील, तर ते सर्व अर्जरद्द करण्यात आलेले आहेत, याची नोंद घ्यावी. जाहिरात प्रसिध्द दिनांकानंतर विहित मुदतीत नव्याने अर्ज करणे बंधनकारक राहील.

8) शासकीय संस्थेमध्ये कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

9) सदर रिक्त कंत्राटी सेवेच्या संख्येत व मानधनामध्ये तसेच पदस्थापनेच्या ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो.

**H.** <u>शैक्षणिक अर्हता / पात्रता :-</u>

1)शैक्षणिक अर्हते बाबतचा सविस्तर व अचुक तपशील नोंद करावा.

2)अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

3)शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे, ती तारीख अर्जामध्ये नमूद करणेआवश्यक आहे.(निकाल घोषित झालेली तारीख)

4)अर्ज भरत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमूद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज ना मंजुर करण्यात येतील.

5)अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमूद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे टक्केवारीमध्ये रुपांतर करुन ते संबंधित संस्थेकडुन प्रमाणित करुन घ्यावे व अर्ज सादरकरताना सादर करावी.

6) उमेदवारांची अर्जामध्ये नमूद माहिती नुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

7) उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हते बाबतची सर्व मुळ प्रमाणपत्र व कागदपत्रे पडताळणीच्या वेळी एक प्रत या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.

8) उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

9) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त विदयापीठातून प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

**I.**<u>पदांसाठीचा अनुभव :-</u>

1) शैक्षणिक अहर्ता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अहर्ता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवांची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाच्या गुणांची परिगणना करण्यात येणार नाही.
2) अनुभवाचा तपशील नमूद करतांना पहिली नियुक्तीचा कालावधी ते सध्याचा नियुक्ती कालावधी क्रमानेच अर्जामध्ये नमुद करावा.
3) अनुभवाचा तपशील नमूद करत असतांना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. अशाच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद करावा.
4) अनुभवाचा तपशील नमूद करताना रुजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
5) ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**J.**संगणक अर्हता व इतर :-

MS-CITप्रमाणपत्र धारण करत असल्याचा तपशील नमूद करावा.

**K-**<u>लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र</u> :

1)शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.
2)विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने निवड प्रक्रिये दरम्यान सादर करणे अनिवार्य आहे.

**L-**<u>अर्ज शुल्क :</u>

1) उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.३००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीतारु.१५०/- रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राप्ट) अर्ज शुल्क असेल. धनाकर्ष पुढील नावे काढावा.

**"DISTRICT INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOC AND 13TH FINANCE"**
Bank of Maharashtra –Ahmednagar, AHMEDNAGAR-414001 (IFSC CODE-MAHB0000937)
योग्य धनाकर्ष शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**M.**<u>निवड प्रक्रिया</u> :-

उपरोक्त सर्व पदांकरिता निवड प्रक्रिया गुणांकन पध्दतीनुसार खालील प्रमाणे राबविण्यातयेईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यकQualifying Examमधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportionकाढले जाईल. (उदा. ६० %गुण असल्यास त्याचे ५० %प्रमाणे Proportion= 60 x50/100=30%) | ५० गुण |

| | | |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अहर्तेपेक्षा अधिक अहर्ता धारण करत असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अहर्ता धारण करत असल्यास विचारात घेतली जाईल.) | अधिकतम २० गुण मिळतील. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportionकाढले जाईल. (उदा.१) स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अहर्ता पुर्ण करुन अतिरिक्त बी.एस्सी. नर्सिंग ही शैक्षणिक अहर्ता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केलेला असल्यास उमेदवारास बी.एस्सी. नर्सिंगच्या अंतिम वर्षात ६० : गुण असल्यास त्याचे २०: प्रमाणे Proportion= 60X 20/100=12गुण मिळतील. | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव असल्यास | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) (शासकीय/निमशासकीय) | ३० गुण |
| एकुण गुण | | एकूण १०० गुण |

**N.**सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणवत्ता यादी**(Merit List)** तयार करण्यात येईल.

1) उपरोक्त प्रमाणे गुणांकन यादी तयार केल्यानंतर उमेदवारांची निवड करण्यापुर्वी रिक्त पदांच्या संख्येनुसार १:३ या प्रमाणात उमेदवारांना मुळ कागदपत्र `पडताळणी करिता बोलविण्यात येईल.
2) मुळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी गैरहजर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व गुणांकन यादीतील पुढील पात्र उमेदवारास संधी देण्यात येईल.
3) मुळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी गैरहजर अर्जदारास निवडीकरिता कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.
4) उपरोक्त निवड प्रक्रिये संदर्भात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, अहिल्यानगर यांचेकडे राहतील. त्यामुळे उपरोक्त नमुद निवड प्रक्रियबदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्यानगर यांचेकडे राहातील.

**O.**<u>सर्वसाधारण सुचना</u> :

1) सदर पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती खालील नमुद संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी http://nagarzp.gov.in या संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे, अनिवार्य राहील.
2) पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
3) जहिरातीत नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याच्या संभव आहे.
4) जाहीरातीत नमुद केलेली पदे ही पुर्णतःकंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाने मंजुर केलेली नियमित पदे नाहीत. सदर कंत्राटी सेवेचा राज्य शासनाच्या कोणत्याही पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनाच्या अन्य नियमित पदावर किंवा रिक्त अशी

कोणत्याही प्रकारे राज्य शासन सेवेत समावुन घेण्याबाबतची मागणी करु शकणार नाही. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असणा-या अशा इतर लाभाची मागणी करु शकणार नाही.

5) जाहीरातीमध्ये नमुद केलेली पदाचे मानधन हे एकत्रित मानधन आहे.

6) सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रदद् करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

7) उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर कोणतेही कागदपत्र स्विकारले जाणार नाहीत.

8) शासन निर्णय दि.१३/०१/२००९ नुसार खुला (अमागास) अनुसुचित जाती/ जमाती प्रवर्ग वगळता इतर मागासप्रवर्गातील(VJ, NT, SBC, OBC)उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठीदि.३१/०३/२०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे(Non Creamilayer)प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जा सोबत तसेच कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

जाहिरात क्र.०२/२०२५

दि. १६/०६/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५

राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर.

प्रति,

______________________________

______________________________

उमेदवाराचा फोटो येथे चिटकवा

## अर्जाचा नमुना

अर्ज केलेल्या पदाचे नांव :______________________________

अर्जदाराचे नांव : ______________________________

अर्जदाराचे वडिलांचे संपुर्ण नांव : ______________________________

जन्मतारीख ______________ (जाहिरात प्रसिध्द तारखेस वय): वर्ष ________ महिना ____________ दिवस ______

अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :

______________________________

______________________________

______________मोबाईल क्रमांकः______________Email id...................

अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय / नाही

जातीचा प्रवर्ग :____________ जातः____________

अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय / नाही

अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :____________

यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्याचा अनुभव आहे काय :- होय / नाही

असल्यास कार्यालयाचे नाव व ठिकाण ______________________________

❖राष्ट्रीयकृत बँकेचे नाव व शाखा...............................................

धनाकर्ष क्रमांक ..................धनाकर्ष रक्कम ...........धनाकर्ष दिनांक.............

अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे / नाही

शैक्षणिक अर्हता :-

| अ. क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | एकुण प्राप्त गुण | अंतीम वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

इतर शैक्षणिक अर्हता :- संगणक, टायपिंग व इतर

| अ. क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयांचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | शासकिय / निमशासकिय / खाजगी | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | एकूण | | | |

अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक नमुद करावा.)

१)............................२).........................३)........................

४)............................५)......................... ६)....................

७)............................८)......................... ९)....................

१०)...........................११).........................१२)...................

वर नमूद केलेला तपशील माझ्या माहिती प्रमाणे खरा आणि बरोबर आहे. सदर पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करत आहे. याची खात्री करुनच मी हा अर्ज करत आहे. मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास कंत्राटी सेवा गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील, त्याबाबत माझी कोणतेही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण :- उमेदवाराची स्वाक्षरी

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी.........................................................

श्री..............................................................................
...............यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी

वय...............वर्ष, राहणार......................................................
..............................................................................
.................................

याव्दारे असे जाहिर करतो/करते की,

१) मी...................................या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ...........(संख्येत नमुद करावे) इतकी हयात मुले आहेत.

त्यापैकी दि.२३/०७/२०२१ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......... आहे

(असल्यास जन्मदिनांक नमुद करावा) जन्मदिनांक ........................

३) दि.२३/०७/२०२१ रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दि.२३/०७/२०२१ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्हठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

# अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील

| अ. क्र. | आवश्यक प्रमाणपत्र | प्रमाणपत्र आहे/नाही | पान क्र. |
|---|---|---|---|
| १) | शाळा सोडल्याचा दाखला | | |
| २) | एस.एस.सी., गुणपत्रिका व प्रमाणपत्र | | |
| ३) | एच.एस.सी. गुणपत्रिका व प्रमाणपत्र | | |
| ४) | पदवी गुणपत्रीका व रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, | | |
| ५) | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका व प्रमाणपत्र | | |
| ६) | अनुभव प्रमाणपत्र | | |
| ७) | आधार कार्ड/मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आकाराचे १ फोटो | | |
| ८) | जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र | | |
| ९) | नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र | | |
| १०) | मराठी टायपिंग | | |
| ११) | इंग्रजी टायपिंग | | |
| १२) | एमएससीआटी | | |
| १३) | छोटया कुटुंबाचे प्रामाणत्र | | |
| १४) | इतर | | |

उमेदवाराची स्वाक्षरी

अर्ज पडताळणी करणा-यारे समन्वयक

अर्ज पडताळणी करणा-यारे अधिकारी